म. ग्रं. सं. ठाणें

विषय
काव्य

संग्रहालय क्रमांक
७५
२८५

लेखक —

सन

पुस्तकाचें नांव
२८५

९५
काव्य

काव्य ७८

मराठी ग्रंथ

# हरिश्चंद्रोपाख्यान.

## मोरोपंती आर्या.

परशुरामपंत गोडबोले यांच्या मदतीनें,

शुद्ध करून,

बाळकृष्ण रामचंद्र शास्त्री वकार

यांच्या छापखान्यांत,

छापिलें.

मुकाम पुणें.

इसवीसन १८५९.

शके १७८१.


विश्वामित्र.
हरिश्चंद्र.
तारामती
रोहिताश्व.

श्रीगणेशाय नमः ॥ हरिश्चंद्रोपाख्यान आर्या प्रारंभ ॥

श्रीमान् गुणरत्नाकर भूप हरिश्चंद्र भानुच्या वंशीं ॥
ज्याची कीर्ति सुरनदी हुनि एक्याही उणी नसे अंशीं ॥१॥
तो सम्राट् शूर वनीं गेला कुतुकें करावया मृगया ॥
दैवें व्यसनभरीं मन भरतां वोढूनि दूर ने मृगया ॥२॥
ऐके त्रायस्व असा करुण स्त्रीशब्द तो अरण्यांत ॥
हरिणातें त्यजुनि ह्मणे माभैषीः ख्यात जो शरण्यांत ॥३॥
तों त्रायस्व अशा विद्यांच्या ऐकतां चि हाकेला ॥
धांवे विघ्नेश ह्मणे ज्या गाधिसुतें अनर्थ हा केला ॥४॥
सुरदुर्लभ विद्यांतें झटतो स्वतपोबळें चि साधाया ॥
कैसें काय करावें मी तो असमर्थ यासि बाधाया ॥५॥
या चि हरिश्चंद्राच्या म्यां हृदयाज्ञीं शिरोनि हा आर्य ॥
क्षुब्ध करावा कोपें हेंनच पावेल सिद्धिला कार्य ॥६॥

---

१ गुणरूप रत्नांची खाण. २ भागीरथीहुनि. ३ राजा. ४ रक्षण कर. ५ भिऊं नको. ६ रक्षण करणाऱ्यांमध्यें. ७ विश्वामित्रें. ८ शिक्षा करायास.

ऐसें योजुनि शिरला विघ्नेश्वर नृपतिच्या हृदय भवनीं ॥
जें शुध्द सदय सादर सेवा तींच्या सदैव ही अवनीं ॥७॥
नृप ह्मणे स्त्रीपीडक माझ्या राज्यांत खळ असा कोण ॥
निबिड तमाचा आश्रय शून्यांत वास्तुचा जसा कोण ॥८॥
सँजला शरीर रक्तें मांसें गृध्रादिकांसि अर्पाया ॥
तर्पाया स्व प्राणा निलदानें क्षुधित मेदिषु सर्पाया ॥९॥
नृप वचनें मुनि कोपें तों विपास्य जुनि वँशि वरांगेल्या ॥
संगन शाचा ही ज्या शुद्धा मानूनि अँशि वरा गेल्या ॥१०॥
प्राकृत भावुनि धांवुनि जाउनि नृप आश्रमांत जो आहे ॥
तों आपणा परि श्री गाधिज मुनिराज कोपला आहे ॥११॥
पाहुनि रक्त मुनि नयन युग जें विद्रविलें शुचि स्वर्ण ॥
नरपतिचें वपु कांपे अश्वत्थाचें जसें नवें पर्ण ॥१२
न मितां तिष्ठ दुरात्मन् तिष्ठ असें तो ह्मणे दटावीती ॥
वाणी नगमें वीज चि मुनि तनु कैल्पांत घन घटावीती ॥१३

---

१ सर्वे पीडितांच्या २ रक्षणीं. ३ कोंपरा ५ सिध्द झाला. ५ प्राणवायु. ६ माझ्या वाण रूप सर्पास. ७ मुनिश्रेष्ठ विश्वामित्र. ८ अपवित्र ९ विश्वामित्र १० सोनें ११ प्रलयकाळ च्या मेघांच्या समुदाय. १२ प्रसवते.

श्रीविश्वामित्रातें विनवी जोडोनि कर असें राजा ॥
स्वामी अपराध नव्हे वेदगुरुप्रोक्त धर्म हा माजा ॥१४॥
यावें युध्द करावें रक्षावें क्षत्रियें महामहिम्या ॥
भगवंता तुमच्या यातें जेंक शिरसिली पहा महिम्या ॥१५॥
विश्वामित्र ह्मणे रे यावें कोणास कोण रक्षावें ॥
वद जरि अधर्मभय तुज कोण तुवां संगरांत लक्षावें ॥१६॥
भूप ह्मणे जे ब्राह्मण अन्यहि क्षेत्रावृत्ति जे तथां घावें ॥
भीत सकळ रक्षावे सैदरातीशीं न संगरीं घ्यावे ॥१७॥
गाधिज ह्मणे जरि असा राजा तूं रक्षितोसि धर्मातें ॥
दे इष्ट दक्षिणा मी करणार विवाहयज्ञकर्मातें ॥१८॥
या मुनिवचनें हर्षे भूप पुनर्जात आपणा मानी ॥
हा निज हृदयांत ह्मणे चुकली होणार जी महाहानी ॥१९॥
राजा ह्मणे अदेय हि रिधलें व्हावें विशंक वद काय ॥
सर्वस्व पुत्र रत्न स्त्री किंवा स्वपुर राज्य पद काय ॥२०॥

---

१ समरांगणांत. २ अनुत्पन्न. ३ साधुश्लोकी. ४ देह.

गाधिज ह्मणे दिल्हें त्वां जें हें म्या घेतलें नृपा जाण ॥
परि राजसूय केला त्वां त्याची योग्य दक्षिणा आण ॥२१॥
भूप ह्मणे करिन तुझी मी देउं मि देह दक्षिणा सेवा ॥
इष्ट प्रतिग्रह तुला मांग मदुक्तां न कोण तो देवा ॥२२॥
मुनि बोले किं बहुना तूं पुत्र कलत्र धर्म सह देहें ॥
राहोनि निराळा भू सर्वस्व स्वपुर राज्य मज दे हें ॥२३॥
ऋषिवचनश्रवण करुनि हर्ष करी निर्विकार सुख जोडी
राजा दिल्हें ह्मण तो जाणो प्रमाश्रु तें चि जळ सोडी ॥२४॥
विप्र करीं दिधल्या या राज्यपदीं जरि बसेन तापसमा ।
प्रभुता तरि कोणि फंड घद का विषमीं वसे न तापसमा ।
भूप ह्मणे मुनिनाथा क्षिति न दिल्ही ते धवां हि तूं स्वामी
काय न वल आतां तुज भूपति तैं प्रभु ह्मणे न जरि वामी
गाधिज ह्मणे जरि प्रभु मी न मदाज्ञा कदापि मोडावी
तरि मज्ज्ञा सन जैयें क्षिति तीं त्वां आजि झी घ सोडा

१आर्या. २मराठा नौ.

यावचनवज्रपातें झाला निश्चेष्ट नृप मुहूर्त भरी ॥
मग पावुनि संज्ञेतें[1] तो सुविवेकें करूनि धैर्य धरी ॥२८॥
निज वज्रकवच[2] जो तो जळगत कुलगुरु वसिष्ठ जाणोनी ॥
राज्यत्याग करि मनीं क्रूरतर ब्रह्मशाप आणोनी ॥२९॥
घे वल्कलें वपुवरुनि तो नृप वस्त्रें विभूषणें उतरी ॥
कीं निःस्पृहता[3] विहिता काळीं विषमीं नदीं जसी सुतरी ॥
वंदुनि निरोप मुनिचा परमानुग्रह मनांत मानुनि घे ॥ ३०
येउनि गृहांतुनि ससुत दार तैं रणिवंशपद्मभानु[4] निघे ॥
तो त्या महीपतिपुढें प्रकटोन तैं पोनदक्षणा[5] मागे ॥ ३१
कोठें जातोसि ह्मणे नार्पुनि जें पोन दक्षणा माजी ॥३२॥
नृपति ह्मणे निष्कंटक राज्यश्री तुज समर्पिली वा हे ॥
अवशिष्ट शिष्टवर्या देहत्रय मात्र राहिलें आहे ॥३३॥
मुनिवर ह्मणे सुशीला सर्वस्व दिल्हें जरी तथापि कवा ॥
तूं दक्षिणेचें[6] देयन देतां बहु व्यथा पिकवा ॥३४॥

---

१ शुद्धितें. २ आपले वज्रकवचरूप. ३ पाव ४ सूर्यवंशरूप कमलास सूर्य. ५ तपाचा नद. ६ संकल्पून.

गाधिज ह्मणे दिल्हें त्वां जें हें म्यां घेतलें नृपा जाण ॥
१ परि राज सूर्यकला त्वां त्याची योग्य दक्षिणा आण ॥२१॥
भूप ह्मणे करिन तुशी मी देउनि देह दक्षिणा सेवा ॥
इष्ट प्रतिग्रह तुला मागमदुक्तां न कोण तो देवा ॥२२॥
मुनि बोले किं बहुना तूं पुत्र कलत्र धर्म सह देहें ॥
राहोनि निराळा भू सर्वस्व स्वपुर राज्य मज देहें ॥२३॥
ऋषिवचन श्रवण करुनि हर्ष करी निर्विकार सुख जोडी ॥
राजा दिल्हें ह्मणतो जाणों प्रमाश्रु तें चि जळ सोडी ॥२४॥
विप्र करीं दिधल्या या राज्य पदीं जरि बसेन ताप समी ॥
प्रभुता तरि कोणि फंड बद का विषमीं वसे न ताप समी ॥२५॥
भूप ह्मणे मुनिनाथा क्षिति न दिल्ही ते धवा हि तूं स्वामी ॥
काय न बल आतां तुज भूपति तें प्रभु ह्मणे न जरि वामी ॥२६॥
गाधिज ह्मणे जरि प्रभु मीं न मदाज्ञा कदापि मोडावी ॥
तरि मत्क्षा — मन जें यें क्षिति तीं त्वां आजि शीघ्र सोडावी ॥२७॥

---

१ आर्या. २ मराठा वगैरे.

या वचनवज्रपातें झाला निश्चेष्ट नृप मुहूर्त भरी ॥
मग पावुनि संज्ञेतें तो सुविवेकें करूनि धैर्य धरी ॥२८॥
निज वज्रकवच जो तो जळगत कुलगुरु वसिष्ठ जाणोनी ॥
राज्यत्याग करि मनीं क्रूरतर ब्रह्मशाप आणोनी ॥२९॥
घे वल्कलें वपु वरुनि तो नृप वस्त्रें विभूषणें उतरी ॥
कीं निःस्पृहता चि हिता कार्लीं विषमीं नदीं जसी सुतरी ॥३०॥
वंदुनि निरोप मुनिचा परमानुग्रह मनांत मानुनि घे ॥
येउनि गृहांतुनि ससुत दार तें रविवंशपद्मभानु निघे ॥३१॥
तो त्या महीपति पुढें प्रकटोन तपोन दक्षणा माजी ॥
कोठें जातोसि ह्मणे नार्पूनि जें पोन दक्षणा माजी ॥३२॥
नृपति ह्मणे निष्कंटक राज्यश्री तुज समर्पिली बा हे ॥
अवशिष्ट शिष्टवर्या देहत्रयमात्र राहिलें आहे ॥३३॥
मुनिवर ह्मणे सुशीला सर्वस्व दिल्हें जरी तथापि कवी ॥
तूं दे ऊंकेलें दे देय न देतां बहु व्यथा पिकवी ॥३४॥

---

१ शुद्धितें. २ आपलें वज्रकवचरूप. ३ पाव ४ सूर्यवंशरूप कमलांस सूर्य.
५ तपोधानद. ६ संकल्पून.

भूप ह्मणे बा नाहीं धनसंपत् काय मी करूं आतां ॥
मज दक्षिणार्पणीं बळयेइल समयांतरीं तुलागातां ॥ ३५
विप्र ह्मणे दानावधि सांग खरायामुलासि पावकसा ॥
वदतां असत्य माझा शाप तुला करिल भस्म पावकसा ॥ ३६
राजा ह्मणे प्रभो तें देइन मी दक्षिणा तुला मासें ॥
विप्र ह्मणे जा धन कितियावीं की र्त्यर्थ आपुलीं मासें ॥ ३७
पोईंचं निघे शिशुतें घेउनि नृप चालवीत राणीतें ॥
पाणीतें विनमरण हिं जननयनीं व्यसनें जेंवि आणीतें ॥ ३८
एकभरितरि पाहो दे मुख ह्मणति सशोक लोक हाकरिती ॥
राहे उभा तयांची करिल कसा तो दयालु हाकरिती ॥ ३९
सोमुनि येउनि सहसा धिक्कार करुनि ह्मणे रहा तोस ॥
मंत्रकरि शिपोरां शीं राज्य दिलें घ्यावया पहातोस ॥ ४०
वदरे जें दान दिलें बुध हरिती काय पुनरपि तयातें ॥
अवमानितोसि मज तूं वृध्दपणीं जें विकुं नरपि तयातें ॥
॥ ४१ ॥

१ अग्नीसारखा. २ महिन्यानें. ३ दुःख. ४ हायहाय. ५ निष्फळ. ६ मसलत.
७ दुष्ट मनुष्य. ८ बापातें.

न मुनि नृप ह्मणे जातों घेउन्येतें कर धरूनि आकर्षी ॥
मुनि तीस दंड हाणी हा ह्मणती नारदादि नाकर्षी ॥ ४२ ॥

इति हरिश्चंद्रोपाख्याने प्रथमोध्यायः ॥

वाराणसीस गेला कांतीनं मनुष्य नाथ परिभुक्ता ॥
विश्वेश राजधानी सर्वांसि वसावयासि बहु युक्ता ॥ १ ॥
वाराणसी प्रवेशीं मुनि भेटे त्यासि भूपती वंदी ॥
बंदी सारख्य वचन करी होय तदा देश शंभुचा नंदी ॥ २ ॥
अंजलि करूनि प्रार्थी हा सुत हे स्त्री असे चि हे प्राण ॥
घे जेणें कृत्य तुझें वद अन्यहि कार्य सत्य हें जाण ॥ ३ ॥
विश्वामित्र ह्मणे रे झाला जो अवधि मास तो पूर्ण ॥
स्मरण असेल जरि तुला तरि देती दक्षिणा मला तूर्ण ॥ ४ ॥
भूप ह्मणे मुनितिलका अम्लानतपोबळा प्रभो बागा ॥
दिवसार्ध शेष आहे तों मज अवकाश दे महाभागा ॥ ५ ॥
गाधिज ह्मणे बहु बरें जातों येतों फिरोनि आजि मला ॥
जरि दक्षिणा न देशिल शापिन मग मी नृपा नव्हे चि भला ॥ ६ ॥

१ स्वर्गऋषी. आशंकित. २ मुनिश्रेष्ठा.

ऋषि जातां भूप ह्मणे आतां कोठें नि घित्त ओपावें ॥
देऊं करुनि न देतां मज वरि ताञ्चित्त कां न कोपावें ॥७॥
संपन्न मित्र असतें तरियेतें संकटांत कामातें ॥
दैवें अहा अकस्मात् त्यजिलें दुःखार्णवांत कां मातें ॥८॥
मरणचि उचित गमे परि सद्वंशज पुरुष उचित न क्लै[2]ब्या ॥
हें ही याळा पत्या मज वांचुनि वांचती कशी शैब्या ॥९॥
मुनिशापील अतिक्रम करितां जो[3] त्युरग तो न कांचावे
जावेचि प्राण नहे चिंता पाशांत पडुन कांचावे ॥१०॥
सुब्राह्मणासि देऊं केलें तें जरि न वारितां मेलों ॥
केलों अकीर्तिनें पतित मी निःसंशय अधोगती गेलों ॥११॥
अथवा प्रेष्यचि व्हावें जैसें कोण्हीं हैया इंभा विक्रिती ॥
तें सात्त्व विक्रय बरा न कळे मज गां जिणार[8]भा विकिती ॥१२
ऐसें बोलुनि राजा दीन अधोमुख वसे तया आर्या ॥
प्रार्थुनि चित्तें तव दे यापरि शैब्या महासती भार्या ॥१३

१ सखा. २ क्लीव नाम. ३ म.पक्षसर्प. ४ दुःखी तळांव. ५ दास. ६ आत्मा.
७ गज्ञ. ८ होणार दैव.

रायायासंसारीं बुधसंरक्षावयासि सत्य जिती ॥
सर्वस्व त्यजिती परि सत्य स्वप्नीं हि साधु न त्यजिती ॥१४
सत्यबहिष्कृत नर जो पितृवनसम वर्जनीय ताचे
पूर्वज सर्व निवावे सत्यें अनृतें करूनि तापावे ॥१५॥
हयमेध सप्तकासह ज्यासस विध राजसूयही घडला ॥
सत्यच्युत कौतिरात स्वर्गापासुनि तसाहि तो पडला ॥१६
झालें अपत्य मजला ऐसें बोलुनि रडावया लागे ॥
राज्ञा ह्मणे न भ्यावें हा बाळ तुझा असे महाभागे ॥१७॥
वदजें धदावयाचें निववावा सूक्त आयको देहा ॥
या तापांत हि माझा त्वत्सूक्ति सुखेंचि कार्य कों देहा ॥१८
झालें अपत्य मजला ह्मणुनि फक हेंचि करिति बुधभार्या॥
ह्मणुनि मज विकुनि घेउनि धन यावी दक्षिणा तया आर्या
॥१९
ऐसें राज्ञी वदतां पावे तत्काळ भूप मोहातें ॥
परि सासज्ञा पावुनि साश्रु वदे जें ह्मणोनि तो हातें ॥२०

---

१ वांचती. २ सत्यभ्रष्ट. ३ स्मशानतुल्य. ४ त्याज्यता. ५ नहुषराजा. ६ भारे.
७ ऐका.

दयिते असें कसें गे अश्राव्य अवाच्य वाक्य वदलीस॥
कर्पूर जीसद्भावा झाला गरल त्यांत शाहि कदलीस॥ २१
कर्णीं मुखीं मनीं न चयावें करवेल तें कसें कर्म॥
न मे स्मृति संलाप स्मृति नाहीं की मला नसे धर्म॥ २२॥
इत्यादि विलाप करुनि राजा मूर्छित पडे करिल काय॥
होय्यारडे विलोकुनि भूवरि सन्मंचकावरिल काय॥ २३
देवी ह्मणे सखि धरणि कांत पडुनि धूळिउपरि मळला गे॥
त्या देहा लागावें रज नवनवज्यासि सुपरिमळ लागे॥ २४
हे तद्वंश मणिक नकसदनीं जरि ह्मणति बुध न कोटि कवी॥
बहु ज्यापासुनि पावत होते बहुमान सधन कोटि कवी॥ २५
करुनि बहु विलाप असें जें विहरिश्चंद्रनी सती हि पडे॥
तों भोजन मागे शिशु शुष्क मुख क्षुधित रोहिताश्व रडे॥ २६
दैवें उठोनि राजा राज्ञी उघडोनि दृष्टि जों पाहे॥
तों तो पुढें चि मुनिवर मागाया दक्षिणा उभा आहे॥ २७

---

१ विष. २ पलंगावर पडणारा. ३ पृथ्वी.

मुनि शिपहातां त्रासें मूर्छआली पुन्हा हि दो घांस ॥
तत्यास रववळवी तें मोहास जसाचि मे घ ओ घांस॥२८
पाहुनि दीना वस्था होउनि चित्तांत भीत तो यातें ॥
मृदु वचनें बोध करी उठवी प्रोक्षूनि शीत तोयातें॥२९
ओप्या थित होय जळ प्रोक्षी जे ळ्हां मुनींद्र तो हातें ॥
उठुनि हरिश्चंद्र पुन्हा पावे पाहूनि त्यासि मोहातें॥३०
मुनि कोपोनि ह्मणे रे दे माझी दक्षिणा अगा राया ॥
रक्षीं सत्या सद्गति सत्कीर्ति सुखां चिया अगारा या॥३१
सत्यें हा रवि तपतो सत्यें भूमि प्रतिष्ठि ता जाण ॥
सत्यांत पुमर्थ सकळ सत्य चि जीवासि पवि लतनुत्राण॥३२
अथवा चुकलों मीच स्पष्ट न तूं पात्र नष्ट सामास ॥
न वळे खळ पळचि ह्मणे जरि झाले अर्थि कष्ट सामास॥३३
तुज मी अलब्ध दक्षिण रवि मावळतां चि निज यशापीन ॥
करिन सुतप्त तपाचा ह्या या विश्वांत विजय शोपीन ॥३४

१ शिंपून. २ सावध. ३ स्थान. ४ पुरुषार्थ. ५ पुष्कळ.

गेला यापरि गाधिज औधिजलधिमाजि भूप बुडवून॥
ते शापभीति वोल्या तद्धैर्य तृणासि दूर उडवून ॥३५॥
शैब्या ह्मणे विनविलें जें सुखवाया बुधाकरा होतें ॥
सत्यप्रतिपालन भव सुयश श्रौडद सुधाकरा होतें ॥३६
प्रभुनें नरकीं मज सह तुज ह्मणधायानें हाय शापावें॥
रक्षीं स्वपूर्वजांच्या अतुलोमुद्रा महाय शापावें॥ ३७
भूप ह्मणे सति जातों निर्लज्ज कृतघ्न तुज विकायाला॥
राक्षस पिशाच येतिल मज पाशीं कठिण तो शिकायाला॥ ३८
वाटेने इल मज घ्या स्त्री ह्मणतां हाचि बोलविलयातें ॥
अथवा खेळ विधिबळ कीं त्या प्रभुचें तेज बोलविलयातें॥ ३९
यापरि बोलुनि जाय श्री[९] विश्वेश्वरपुरींत सत्वरहा ॥
ज्याच्या चित्तासि ह्मणे दुःखनिधा प्रतिपदीं सुसत्वरहा॥ ४०
वदतां बहु गहिंवरला मैं[१०] हिवरला जे ह्मणे सुधीर मला॥
हंस तिल धैर्य धरावें कीं[११] सत्वीं सर्व ही सुधीर मला॥४१॥

१ दुःखसमुद्रांत. २ वावटळ. ३ सत्यरक्षणापासून झालेलें यश. ४ लज्जाभ्रष्ट. ५ चंद्रास. ६ दुष्ट. ७ विश्वामित्राचे. ८ मला. ९ काशीत. १० हरिश्चंद्र. ११ कांकी. १२ ब्राह्मणा.

मोध्याने भूप ह्मणे पुरजन हा वचन आयकामातें ॥
कोण असें पुसतां तरि पुशिल्या येईल कायकामातें ॥ ४२

स्पष्ट नृशंस अमानुष राक्षस त्याहूनि पापतर आहे ॥
स्त्रीतें धनार्थ विकतो जो मीनमरें हिताहित न पाहे ॥ ४३

ज्या कोणाला दासी व्हावी कार्यें करावया गेहीं ॥
तो येउनि घेवो हे जोंवरि आहेत मंद सुया देहीं ॥ ४४

ऐसें ऐकुनि आला वृद्ध ब्राह्मण ह्मणे गृहीकार्यी ॥
न शके करावया बहु सुकुमारी मम मनःप्रिया भार्या ॥ ४५

व्हावी मज दासी हे ह्मणुनि धन उदंड दे करी सवदा ॥
हरहर दुष्कर तो स्त्री विक्रय अंसु विक्रया परीस वदा ॥ ४६

न वदे न करि क्रिया पुढें होय हरिश्चंद्र शोकहतचित्त ॥
तद्वल्कलांचलीं तो बांधी आपणचि भूमिसुर वित्त ॥ ४७

मग चाल चाल ह्मणतां सोडुनि पतिपुत्र न निघतां क्षिप्र ॥
केशां धरुनि राज्ञीतें स्वगृहा वोढीत चालवी विप्र ॥ ४८

१ घातुक. २ कामधंदा. ३ घरी. ४ माझे प्राण. ५ आवडती. ६ कठिण.
७ प्राणविक्रयापेक्षां. ८ दुःखित. ९ पदरीं. १० ब्राह्मण. ११ मा[illegible]

विप्रें ओढुनि नेतां शिशु शोकें ह्मणुनि अंब अंब रडे ॥
झोंबे वत्सासि मनीं फोडीती माय गाय हंबरडे ॥ ४९ ॥
राज्ञी विप्रासि ह्मणे बापा पळ मात्र सोड रोहोंदे ॥
मग मज दुर्लभ होइल शिशुचें मुख पोट भरुनि पाहोंदे ॥ ५० ॥
डोळ्या पुसोनि नेत्रें पाहे परतोनि रो[3]हिताश्वास ॥
अत्युष्णा दीर्घ सोडी तो पतिला होय मो[4]हिताश्वास ॥ ५१ ॥
येवा दुरूनिंच पहा राजसुता ओतकें न ओंगातें ॥
झालें दासी मी कां नातें पहिलेंचि धरिशि कां गातें ॥ ५२ ॥
द्विज केशां धरुनि ओढी तो शिशुही वस्त्र धरित कवळून ॥
खवळून पदें हाणी विप्र परि न व्हेचि दूर जवळून ॥ ५३ ॥
जरि ताडिला तरि हि तो अंबांब ह्मणोनि शिशु मिठी घाली ॥
न्हाली घर्माश्रुजळें वंदुनि विप्रासि विनविती झाली ॥ ५४ ॥
बाचेतली जशी हे मी दासी हाहि बाळ घे दास ॥
नव[7] कार्यसाधिकाक्षम जरि या होई न पात्र खेदास ॥ ५५ ॥

१ आई आई. २ तारामती. ३ पुत्रास. ४ मोहक. ५ स्पर्शू नको. ६ रागावून.
७ काम करण्यास समर्थ.

गाईशीं वत्स जसा मजशीं शिशु तें तसा करीं युक्त ॥
बापा प्रसन्न होया दासीचें हें चिचाल वीं उक्त ॥ ५६ ॥
द्विज तो त्याही शिशुचें जें झालें मोल धर्मशास्त्रमतें ॥
बांधोनि नृपतिलांदि घेऊनिसें दुत्तरीयवल्कलें तें ॥ ५७
विप्रें केली ज्याची व्हावी धनदाससही खरे दीन ॥
विधि फिरतां होती जे प्रभुचे जन दास ही खरे दीन ॥ ५८
स्त्रीसुत घेउनि गेला द्विज झाला जेध चा दिसेना सा ॥
नृप रडुनि ह्मणे मज हे अयापि मशी च कीं दिसें नासा ॥ ५९
रविनें न निरखिली जे स्पर्शलिया तें विंशाक नव्यजनें ॥
अवलोकिली पुरीं ती ओढुनि नेतां असंख्य नव्यजनें ॥ ६०
ज्या वरि करीत होत्या बहुत चिरायादयासदा सत्व ॥
जीचें सांध्वीशनमत ती वायां दयास दासत्व ॥ ६१
एकं म्या चिकुतभ्रें बुडविलि दुःखार्णवांत मज्जाया ॥
केलें नच साध्वीनें नच त्या शिशुनें ही पाप मज्जाया ॥ ६२

---

१ ह्मणणें. २ राजाचें आंगवस्त्र. ३ कुबेरास. ४ माफ. ५ पाहिली. ६ निर्भयपणें. ७ पंख्यानें. ८ धैर्य. ९ अनेक पतिव्रतां मध्यें मान्य. १० पुत्र. ११ माझी स्त्री. १२ बुडाया

सति विकुनि घेतलें त्वां गुर्वर्थ तुवां हि बा शिशो भावें ॥
जें वियशें मुक्तांचा तें विमवा होनि गशि शोभावें ॥५३

धिक्कार मला केष्टीं सुकलत्र तसेंचि लादिलें मुलतें ॥
शत कोटि सार घदितचि हें माझें हृदय अन्यथा उलतें ॥५४

हा सति हां मति तिरस्कृत चंद्रे तुज विकुनि हीन पोमेला ॥
हा तनय हा तनय मीं जोडुनि हिनया महा अघा मेला ॥५५

ऐसे विलाप करितां गाधिज येऊनि दक्षिणा मागे ॥
फिरफिरुनि येरझारा करि परि भंग वाचलेश हीं भागे ॥५६

सुत दार विक्रयार्जित धन जें दे त्यासि भूप परदन मुनी ॥
अल्प म्हणुनि बहु कोपें कठिणवदें दुर्निरीक्ष्य वदन मुनी ॥५७

अधमा योग्य अशा या इतुक्या शा दक्षिणे मिंता पसहा ॥
पात्रापमान करिशी तरि लेश महाप्रताप तापसहा ॥५८

कोपे भूप म्हणे बा अन्या देई न दक्षिणा आर्या ॥
भार्या सुत विकुनि दिल्हें हें धन अवकाश दे मला कार्या ॥५९

---

१ कोत्यांचा. २ कष्टावस्थेंत. ३ वज्रसारानें घडलेलें ४ हा स्थानें चंद्राचा-पराभव करणारे. ५ दुःखित झालो. ६ नीतिभ्रष्ट. ७ पापानें. ८ विश्वामित्र. ९ पुत्रस्त्री विकून घेतलेलें. १० उग्र मुद्रेचा.

विश्वामित्र ह्मणे अवकाश दिन चतुर्थ भाग दिधला हे ॥
समज स्पष्ट ब्रह्म क्षोभें जनतापनै केविधला हे ॥ ७० ॥
ज्याय हरिश्चंद्रातें यापरि मुनिराज तो दटावून ॥
जा विप्र स्मरण तसें जें चिंतपन कांत गिरितटाऊन ॥ ७१
भूप मनांत ह्मणे जें दयिते तें सूनु तें विकायातें ॥
केलें धैर्य करावें म्यां आपुलिया हितें विंकायातं ॥ ७२
मज दक्षिणा न देतां नेइल शापूनि यावरि लयातें ॥
प्रभु हा प्रसन्न आज्ञा न करूनि कवण कृती करिलयातें ॥ ७३
करुनि विचार असा तो साधुकरा यासि आपुला विकरा ॥
म्या मज कोण्ही ऐसें पौरांच्या स्पष्ट गे कवी निकरा ॥ ७४ ॥
ऐसी संसाराची होतां दैवें करूनि बंडाळ ॥
ये विकत हरिश्चंद्र प्रभु ला घ्यायासि उग्र चंडाळ ॥ ७५
चांडाळ रूप धर्मप्रभु परिसमजें न तत्व भूपातें ॥
कोण असें त्यासि पुसे बहु कंटाकुनि तदुग्र रूपातें ॥ ७६

---

१ एक प्रहर. २ बहुत प्रकारच्या. ३ पापें. ४ सूर्यकांत. ५ पुण्यवान. ६ लोकांच्या ७ समुदाया. ८ यमधर्म.

सांगे मृतकंबल हर मी चांडाल प्रवीर या नावें ॥
घेतां विकत तुज धनें स्वल्पें विपुलें ही सत्य मानावें ॥७७

भूपति ह्मणे करीना मी हें चांडाल दास्य तापा प ॥
जो परतोनि गात गुणें त्याहूनि बरा महर्षिचा शाप ॥७८

ऐसें नृपति वदे तों ये मुनि कोपोनि लोचनें फिरवी ॥
विरवी मन हि नृपाचें ऐसें अत्युग्र तेज तो मिरवी ॥७९

नृपतिसि ह्मणे विपुल धन देतो चंडाल हा तदा दान ॥
कां न करिशी तुझें मन सुजनें दंडोल हात दादान ॥८०

भूप ह्मणे भगवंता केवळ ठेवूनि दृष्टि वित्तांत ॥
यद्दल रविकुल ज्याच्या केसें चांडाल दास्य चित्तांत ॥८१

विप्र ह्मणे धन घेउनि यापासूनि स्वविक्रयें जरि न ॥
क्षिप्र मला देशिल तरि शापुनि तुज आजि भस्म मी करिन ॥८२

पाय धरुनि राय ह्मणे हाय कसें माय बाप हें वदशी ॥
दास्यार्थ नृप निमज घे स्वीकारी चंद्र काय गा नदशी ॥८३

---

१ प्रेतवस्त्र घेणारा. २ चाकरी. ३ फिरपकवी. ४ त्याचें ग्रहण ५ शासनाला. ६ पावत.

धनशेषें दासतुझा झालों मीहो प्रसन्न भूदेवा ॥
देवात्सल्यें शरणागत दीना अभयदानें घे सेवा ॥८४
विश्वामित्र ह्मणे तूं जरि माझा दास तरि तुज स्वामी ॥
यांचां डाळा देतों घेउनि वित्तार्बुद स्वयें हामी ॥८५॥
ऐसें वदतां राजा जरि न मुनि वदे ने कों कडकडोंबा ॥
तरि अर्बुद धन घे दें त्यास ह्मणे दास नें कडकडोंबा ॥८६
बांधुनि ताडुनि ओढुनि नेतिन देउनि रडों पडों बकरें॥
तैसेंच तें नृपातें दंड उगारूनि उग्र डोंब करें ॥८७
स्वभ्थानातें नेला बांधुनि पति भूपिचा करकरून ॥
तो स्थापिला श्मशानीं सांगुनि अधिकार चाकर करून
॥८८

इति हरिश्चंद्रोपाख्याने द्वितीयोध्यायः ॥

राजा वसे श्मशानीं घेंशव कर विधि पुढें उपायन से ॥
जेथें परासु नेती बहु काळ अर्पिलें उपायन से ॥१
हा हा असें स्मरोनि स्त्री सुत साकेत सचिव पौर वदे॥
तो पितृवन वासन या दुःसहतर ताप न विरोरवदे ॥२

१ ब्राह्मणा. २ रागें भरून कों. ३ नोकर ४ श्मशान. ५ नरक.

झाला तदा पितृवनीं धूमभसित धारणें मलिन काय ॥
होय हरिश्चंद्र प्रभु वेदविपत्काल तो कलिनकाय ॥३
झाडनि पुल्कसदास दारशां पास्किनीश नां गाहे ॥
पाहे स्वप्न तयावरि तें हें संक्षिप्त वर्णिलें आहे ॥४
शापमूल्या करितां ता नरवर पितृकाननीं बहु भ्रमला ॥
ये झाप झोपडींत स्त्रीसुत चिंते करूनियां भ्रमला ॥५
पाहे स्वप्न असें कीं गुरुला गुरुदक्षिणा दिली कांहीं ॥
परि ती होउनि हर्षें रोमांचित सविधि आर्पिली नाहीं ॥६
त्या दोषें आयुःक्षय होतां आपण महागदें मेलों ॥
गर्भांत पुल्कसीच्या भोगाया नरकयातना गेलों ॥७
ये श्रुति सुटतां जाया दुष्कृत पावावयासि शर्मातें ॥
होईन गुरुदेवचरण शरणागत मी करीन धर्मातें ॥८
हें स्वप्न निर्गमें त्याचा अनुतापां विसरत्या क्षणीं पडला ॥
शपमूल्यग्रहणाचा लोभं शिभुपणांनें मानसीं जडला ॥९

---

१ विपत्ति समय. २ चांडालदास ३ राजा ४ श्मशानीं

सप्तम वर्षीं वसतां प्रेतस्थानीं स्ववृत्ति पाळाया ॥
शव आणिलें अधमगुणि विप्राचें पितृवनांत जाळाया ॥ १०
शव नेल्या स्तव केला बहु दाह निरोध म्हणुनि तापाला ॥
पावुनि देते झाले क्रुद्ध द्विज नरकहेतु शापाला ॥ ११ ॥
तत्काळ चि काळाच्या दूतांनीं आंवळोनि पाशांनीं ॥
पीडुनि आपणाला नेलें भीनासिजें षिदोशांनीं ॥ १२ ॥
सकळ नरक शतवर्षें भोगविले पापयोनि मग नाना ॥
राहो हा भोग्यांच्या तद्दिस्तर लापवील बहु काना ॥ १३
द्यूतें हरविलें निज राज्य पद कलत्र सुत असें पाहे ॥
एकाकी धी जनवनीं मन चिंताशोक आपुलें वाहे ॥ १४ ॥
भ्रमतां भ्रमतां विपिनीं तों धांवे आपणासि हरि खाया ॥
परि तो शरभें सहसा वधिला जोडा नसे चि हरि खाया ॥ १५
तों तों पाहे आपण पडलों स्त्री पुत्र रत्न शोकांत ॥
हारविलें सर्वस्व द्यूतें झाली अपकीर्ति लोकांत ॥ १६

---

१ कोल्ह्यांनीं. २ सिंह.

यावहरिश्चंद्रासे रक्षीतें मुख्यकीं शेरण्यांत ॥
ऐशी श्रवणीं शिरली शैब्येची हाक त्या अरण्यांत ॥ १७
बहु शोधिलें वनीं परि न कलत्र न पुत्र रत्न आढळलें ॥
धैर्य सह अश्रु तेव्हां ह्मणतां शोकें करूनि हा ढळलें ॥ १८
स्वर्गीं आपण आहें ऐसें स्वप्नांत भूपती पाहे ॥
तेथें यमें भटकष्टा शैब्या देखे नतीं दशा साहे ॥ १९
तुटले हार कच शिरीं सुटले फुटले चुडे वसन फिटलें ॥
ती दुर्दशा प्रियेची पाहुनि नृप चित्त जीवितीं विटलें ॥ २०
प्रियदार दुर्दशेतें पाहुनि बहु गहिंवरें गळा दाटे ॥
तों आपणाहि नेलें यमदूतांनीं असें नृपा वाटे ॥ २१ ॥
पाशनिबद्ध गतप्रभ राहुमुखीं जेंवि पतित रवि पत्ती ॥
आपण तेंचि अनुभवी ऐसी स्वप्नांत अतितर विपत्ती ॥ २२
यमधर्म ह्मणे मजला त्वां ठावा नशब्द बा राजा ॥
तुज त्या विपत्ति गाधिज कोपें सर्वाहि अब्द बारा जा ॥ २३

१ दयाळूमध्यें. २ यमदूतांनीं ओढलेली. ३ भार्या. ४ तेजहीन.
५ विश्वामित्र. ६ वर्ष

देइल यावरिहि तुला पुत्रमरणशोक जाण हें साचें ॥
परि सत्व कवच असतां वज्र न होईल अग्रे कें साचें ॥ २४
न मज हरिश्चंद्रा त्वां मानावा स्वविधि हेतु शोकातें ॥
दुलां सि ह्मणे सोडा जाऊं या हा मनुष्य लोकातें ॥ २५
दूतां हीं यम लोकीं हूनि ढकलितां चि त्यां घडे पतन ॥
वाटे देवें केलें दुःखातें भोगवावया जतन ॥ २६ ॥
स्वप्नीं पाहोनि असें पतनभयें भूप जाहला जागा ॥
गडबडुनि दृष्टि उघडुनि पाहे तों आपुला चि तो जागा ॥ २७
भूप ह्मणे शिव शिव हो स्वप्नांत अनर्थ पाहिला काय ॥
सत्य चि असें ह्मणावें कैसा दुःखांत राहिला काय ॥ २८
स्वप्न ह्मणावा तरि कसि आली आंधींत झोंप डिखळाची
अशानि पुढें स्थिति मांडिल न प्रकृतिच काय झोंप डिखळाची
सहयासि पुल्कसांतें अनुभविला द्वादशाब्द जों तोंपें ॥ २९
तो सांगुनि सत्य चि हा किंवा मिथ्या असें पुसे क्ष्मोप ॥ ३०

१ शरीर. २ दुःखांत. ३ वज्रापुढें. ४ भूप हरिश्चंद्र.

कोणी ह्मणती मूढा हा स्वप्न स्पष्ट कां खरा गमला ॥
कोणी चंडाळ ह्मणति सत्य हरिश्चंद्र तो बहु भ्रमला ॥३१
बहु दुःसह दुःखक्षेत घातलिया त्यांत जें विखारातें ॥
त्या स्वप्ना अत्यद्भुत उमलत स्वल्प जें विखारातें ॥३२॥
अत्यार्त हरिश्चंद्रें आठविला देव कनकपट ज्याला ॥
प्रणतां भव सुदुस्तर ही जेंवि जलधि निपट तुच्छ घट ज्याला
धर्म बृहस्पति शक्र प्रमुख सुरांतें हि हस्त जोडून ॥३३
स्त्री पुत्र त्राणार्थ प्रार्थी निश्वास दीर्घ सोडून ॥३४
नमुनि विधिला भवाला त्या त्या अग्न्यादि लोकपाळाला ॥
करि आला शव मूल्य ग्रहण व्यवहार जो कपाळाला ॥
तों शैब्या अहिहत सुत घेउनि आली श्मशान देशाला ॥३५
कवि संशयी शाकेच्या जीची वर्णूं यशा न दे शाला ॥३६
ती रडत ह्मणे झाली राजसुता हे कशी भवदवस्था ॥
हे हीनबल परासुन झालें जी मी अशी भवदवस्था ॥३७

---

१ दुःखात पडल्या. २ प्राण. ३ पीतांबर. ४ अत्यंत. ५ अगस्तीला. ६ शिवाला. ७ प्रतापरत्नाकर. ८ तुझी गति. ९ मृत. १० संसारदावानलांत रहाणारी.